# सावल्या

शैशवाच्या छोट्या सावल्या
बाललीलांनी भारलेल्या ।
न कळत्या वयाला
सारं काही शोभणाऱ्या ॥

तरुणपणाच्या मध्यम सावल्या
अहंपणानी भरलेल्या ।
मस्तीच्या उन्मादाने
किर्ती, अपकिर्ती फैलावणाऱ्या ॥

उतारवयाच्या उतरत्या सावल्या
मावळतीच्या सूर्यासारख्या ।
जीवनातील कर्तव्यांच्या
हिशोब मांडणाऱ्या ॥

ऊन-सावलीच्या खेळाप्रमाणे
जीवनाच्या आलेख मांडणाऱ्या ।
लांब- जवळ भासणाऱ्या
आपल्याच मस्तीत जगणाऱ्या ॥



सौ. अस्मिता ज्ञा. बालेकर
'वंदेमातरम्', नवाथेनगर
अमरावती.